महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४१ वा | दिनांक : २१/०७/२०२५ | वार : सोमवार

# राज्यातील शेतकरी त्रस्त अन् कृषिमंत्री 'रमी' खेळण्यात व्यस्त - रोहित पवार



**मुंबई** : कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळतानाचा एक व्हिडिओ समोर आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी हा व्हिडिओ ट्विट करत कोकाटेंवर जोरदार टीका केली आहे. "कधी शेतीवर या महाराज, खेळ थांबा, कर्जमाफी द्या!" अशा आशयाच्या हॅशटॅगसह त्यांनी सत्ताधारी मंत्र्यांवर निशाणा साधला.

दरम्यान मी कोणताही गेप खेळत नव्हतो. यूट्यूबवर गेल्यावर अनेक जाहिराती येत असतात. वरच्या सभागृहात काय सुरू हे बघण्यासाठी यूट्यूब सुरू केले तेव्हा ती जाहिरात आली आणि मी ती स्किप केली. पण काही सेकंदाचा व्हिडिओ रेकॉर्ड करण्यात आला, असे म्हणत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी व्हिडिओवर स्पष्टीकरण दिले आहे.

रोहित पवार यांनी X वर लिहिले की, जंगली रमी पे आओ ना महाराज...! सत्ताधारी राष्ट्रवादी गट भाजपला विचारल्याशिवाय काहीच निर्णय घेत नाही. त्यामुळे शेतीच्या प्रश्नांवर निर्णयच होत नाहीत. दररोज ८ शेतकरी आत्महत्या करत असताना कृषिमंत्री निवांत रमी खेळत असल्याचे दिसत आहे, असे म्हणत रोहित पवारांनी का◌ेकाटेंवर निशाणा साधला आहे.

आमदार रोहित पवार म्हणाले की, जंगली रमी पे आओ ना महाराज...! सत्तेतल्या राष्ट्रवादी गटाला भाजपला विचारल्याशिवाय काहीच करता येत नाही म्हणूनच शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित असताना, राज्यात रोज 8 शेतकरी आत्महत्या करत असताना सुद्धा काही कामच नसल्याने कृषि मंत्र्यांवर रमी खेळण्याची वेळ येत असावी.रस्ता भरकटलेल्या या मंत्र्यांना आणि सरकारला पिक विमा-कर्जमाफी-भावांतर ची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांची कभी गरीब किसानो कों खेतीपर भी आओ ना महाराज ही आर्त हाक ऐकू येईल का? कधी_शेतीवर_या_महाराज खेळ_थांबा_कर्जमाफी_द्या 'रस्ता भरकटलेल्या या मंत्र्यांना आणि सरकारला पिक विमा-कर्जमाफी-भावांतर ची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांची "कभी गरीब किसानो कों खेतीपर भी आओ ना महाराज" ही आर्त हाक ऐकू येईल का?' असा प्रश्न देखील रोहित पवार यांनी विचारला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, या खोटारड्या, धोकेबाज सरकारला शेतकऱ्यांशी काही देणंघेणं राहिलं नाही, शेतकरी मरतोय आणि कृषिमंत्री रम्मी खेळतोय, म्हणून माझं शेतकरी बांधवांना आवाहन आहे यांना धडा शिकवा.

महायुती सरकारमधील मंत्री आणि आमदारांचे वादग्रस्त व्हिडिओ सातत्याने समोर येत असल्यामुळे सरकार अडचणीत येत असल्याची जोरदार चर्चा आहे. काही दिवसांपूर्वीच आमदार संजय शिरसाट यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये ते बनियान मध्ये असून त्याच्या खोलीत रोख रक्कम भरलेली बॅग दिसत होती. त्याआधी आमदार संजय गायकवाड यांचा कॅन्टीन चालकाला मारहाण करतानाचा व्हिडिओ समोर आला होता.आता कृषी मंत्रीच मोबाइलवर रमी खेळताना दिसत असल्याने, सरकारमधील शिस्त आणि जबाबदारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# भाजपच्या माजी कार्यकर्त्यावर हनीट्रॅप व पॉक्सोअंतर्गत गुन्हा



**मुंबई** : भाजपचे कार्यकर्ते आणि एकेकाळी मंत्री गिरीश महाजन यांच्यासोबत आरोग्यदूत म्हणून कार्यरत असलेले प्रफुल लोढा यांच्याविरोधात मुंबईतील साकीनाका पोलिस ठाण्यात पॉक्सो कायद्यांतर्गत आणि हनीट्रॅप प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. ही माहिती समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून चर्चांना जोर आला आहे. सध्या राज्यभरात हनीट्रॅप प्रकरण गाजत असून, त्याची पाळेमुळे नाशिक आणि जळगावपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील पहूर येथील व्यापारी प्रफुल लोढा हे मुंबईतील चकाला परिसरातील लोढा हाऊस या निवासस्थानी एका अल्पवयीन मुलीसोबत आढळून आले होते. नोकरीचे आमिष दाखवून त्यांनी संबंधित मुलीवर कथितरीत्या अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी मुंबईतील अंधेरी आणि साकीनाका पोलिस ठाण्यांमध्ये लोढा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, ५ जुलै रोजी मुंबई पोलिसांनी त्यांना अटक केली होती. त्यानंतर पहूर येथील त्यांच्या घराची झडती घेण्यात आली असून, काही महत्वाचे दस्तऐवज आणि वस्तू पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

भाजपमध्ये अनेक वर्ष सक्रिय राहिल्यानंतर, मागील विधानसभा निवडणुकीत प्रफुल लोढा यांनी पक्षाला रामराम करत वंचित बहुजन आघाडीच्या तिकिटावर उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, त्यांनी निवडणूक लढवण्याआधीच माघार घेतली. काही काळ भाजपापासून दूर राहिल्यानंतर त्यांनी पुन्हा पक्षात पुनर्प्रवेश केला, मात्र त्यांना कोणतेही जबाबदारीचे पद देण्यात आले नव्हते.

प्रफुल लोढा हे सातत्याने वादग्रस्त विधानांमुळे आणि वर्तणुकीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहेत. सध्या ते भाजपात असले तरी राजकारणात फारसे सक्रिय नव्हते. मात्र आता त्यांच्यावर मुंबईमध्ये पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्यामुळे ते पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. स्थानिक पोलिसांनी या प्रकरणी अधिकृत माहिती देण्यास नकार दिला आहे.

प्रफुल लोढा हे एकेकाळी जळगाव जिल्ह्यातील एका मातब्बर नेत्याचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जात होते. मात्र, कालांतराने त्यांनी त्या नेत्यावरच गंभीर आरोप करत त्यांच्यापासून फारकत घेतली. त्यानंतर लोढा यांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला आणि लोकसभा निवडणूक २०२४ साठी त्यांना वंचितकडून उमेदवारीही देण्यात आली होती. मात्र, केवळ पाच दिवसातच त्यांनी उमेदवारीमधून माघार घेतली.

कथित समाजसेवक आणि 'आरोग्यदूत' म्हणून एक काळी ओळख निर्माण केलेल्या प्रफुल लोढा यांच्या विरोधात यापूर्वीही काही गुन्हे दाखल झाल्याची माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे ते वेळोवेळी वादाच्या भोवऱ्यात सापडले असून, त्यांच्या हालचालींवर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सतत लक्ष ठेवले जात आहे.

# लातुरात छावा संघटना-राष्ट्रवादी काँग्रेस दादा गटाचे कार्यकर्ते भिडले



**लातूर** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानपरिषदेत मोबाईलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर शेअर केल्यानंतर, अखिल भारतीय छावा संघटनेने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

लातूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेच्या समाप्तीनंतर छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना निवेदन दिलं. यावेळी माजी मंत्री संजय बनसोडे देखील उपस्थित होते. निवेदनादरम्यान, माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी करण्यात आली. यावेळी निषेध म्हणून टेबलवर पत्तेही फेकण्यात आले.

या घटनेनंतर अखिल भारतीय छावा संघटना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते यांच्यात वाद निर्माण झाला आणि दोन्ही गटांमध्ये जोरदार धक्काबुक्की झाली. सुनील तटकरे हे आज लातूर येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्यासाठी आले होते. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. पत्रकार परिषद संपल्यानंतर अखिल भारतीय छावा संघटनेचे काही पदाधिकारी त्या ठिकाणी पोहोचले.

त्यांनी विधानपरिषदेत मोबाईलवर गेम खेळणाऱ्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर कारवाईची मागणी करत जोरदार निषेध नोंदवला. "सभागृहात गेम खेळणाऱ्या मंत्र्यांना पदावर राहण्याचा अधिकार नाही," असे म्हणत छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांना निवेदन दिले.

निवेदन देत असताना त्यांनी निषेध म्हणून तटकरे यांच्या समोर टेबलावर पत्ते फेकले आणि "गेम खेळायचा असेल तर घरी खेळा!" अशा जोरदार घोषणा दिल्या. या वेळी छावा संघटनेने माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी करत, सभागृह हे जनतेच्या हिताचे कायदे बनवणारे पवित्र स्थान असल्याचे ठासून सांगितले. त्यांनी कोकाटे यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संतप्त भावना व्यक्त केल्या.

अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी लातूरमध्ये प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन दिल्यानंतर परिस्थिती चिघळली. निवेदन देऊन बाहेर पडलेल्या छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक कार्यकर्त्यांनी हल्ला चढवल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात छावा संघटनेचे विजयकुमार घाडगे पाटील यांना जोरदार मारहाण झाल्याची माहिती समोर आली आहे.

छावा संघटनेचे कार्यकर्ते रेस्ट हाऊसच्या दुसऱ्या खोलीत बसले असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे काही कार्यकर्ते तिथे आले आणि त्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांवर अचानक हल्ला चढवला, असा आरोप आहे. पोलिसांनी वाद मिटवण्याचा प्रयत्न केला, मात्र परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात अपयश आले आणि छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना गंभीर मारहाण करण्यात आली.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना विजयकुमार घाडगे पाटील म्हणाले, "आम्ही फक्त कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी करत निवेदन दिलं. शेतकऱ्यांच्या हितासाठी लढणारे मंत्री जर सभागृहात पत्ते खेळत असतील, तर त्यांच्याकडून शेतकऱ्यांचं भलं होईल का? या प्रश्नावर आम्ही आवाज उठवला. त्यानंतर आम्ही रेस्ट हाऊसमध्ये बसलो होतो, तेव्हा राष्ट्रवादीचे गुंड आमच्यावर तुटून पडले. सत्तेचा माज काय असतो, हे त्यांच्या वागण्यातून स्पष्ट झालं आहे. छावा संघटनेमध्ये शेतकऱ्यांची पोरं आहेत, आणि याचा योग्य वेळी हिशोब घेतला जाईल," असा इशारा त्यांनी दिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ जुलै २०२५

## वेरूळ मंदीर व लेणी परिसरातील अतिक्रमाणावर चालणार बुलडोझर






**खुलताबाद : (प्रा.योगेश रावते)** वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिर देवस्थान परिसर तसेच जगप्रसिद्ध वेरूळ लेणी परिसरातील विकास काम करण्यासंदर्भात मंदिर आणि लेणी परिसरातील झालेले अतिक्रमण लवकरच हटवण्यात येणार असून जिल्हाधिकारी श्री दिलीप स्वामी यांनी दिलेल्या 11 जुलै च्या पत्रानुसार नाशिक येथे कुंभमेळा भरणार असून त्यासाठी बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिर देवस्थानच्या दर्शनासाठी पाच ते दहा लाख भाविकांची गर्दी अपेक्षित धरता या परिसरातील झालेले अतिक्रमण काढण्यासाठी सर्व संबंधित विभाग प्रमुखांना या संबंधित प्रारुप आराखडा तयार करून नियोजन करण्याचे निर्देश दिलेले आहेत श्री घृष्णेश्वर मंदिर समोरील आणि परिसरातील अतिक्रमण त्याचबरोबर सोलापूर धुळे महामार्ग ते वेरूळ मंदिर रस्त्यावरील अतिक्रमण, दौलताबाद टी पॉइंट ते वेरूळ मंदिर यापर्यंतचे अतिक्रमण काढण्यात येणार असून त्यासाठी खुलताबाद तहसील कार्यालयामध्ये उपविभागीय अधिकारी संतोष गोरडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीस तहसीलदार स्वरूप कंकाल गटविकास अधिकारी प्रकाश नाईक सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता दिलीप कोलते उपअधीक्षक भूमी अभिलेख सेवक श्री घृष्णेश्वर मंदिर देवस्थानचे अध्यक्ष श्री कुणाल दांडगे उपाध्यक्ष श्री योगेश टोपे सरपंच सौ कुसुमताई मिसाळ आदींसह पदाधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तिफण लेखक - वाचक मेळाव्यात होणार वाचन संस्कृतीचा जागर



**कन्नड : (प्रतिनिधी) :** त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा, कन्नड, अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे शाखा कन्नड यांच्या वतीने कन्नड तालुक्यातील हतनूर येथे येत्या३ ऑगस्ट रोजी तिफण लेखक वाचक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्याचे उदघाटन डॉ. सर्जेराव जिगे, अध्यक्षस्थानी प्रकाशक के. एस. अतकरे राहणार आहे. कन्नड तालुक्यात साहित्यिक चळवळ चांगलीच रुजते आहे. अनेक नवोदित कवी - लेखक सातत्याने लेखन करीत आहेत. तालुक्यात विविध वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत. कन्नड तालुक्यात वाचन संस्कृती ही रुजावी या हेतून लेखक - वाचक यांच्यात सुसंवाद घडावा, व्यापक विचार मंथन होवून , साहित्य चळवळीला बळ मिळावे या हेतूने ग्रामीण भागात हा मेळावा होत आहे. तालुक्यातील साहित्यिकासह काही बाहेरील मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. या वेळी वाचन संस्कृतीच्या संवर्धनात साहित्यिकांची भूमिका या विषयावर परिवर्तनवादी कवयित्री व विचारवंत डॉ. प्रतिभा अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली परिचर्चा होणार असून त्यात साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय गायकवाड, संत साहित्याचे अभ्यासक व अधिकारी शरद भिंगारे, मुख्याध्यापक तथा संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रुपेश मोरे, नव्या पिढीचे कवी सुनील डोके यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या तिफण लेखक - वाचक मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक डॉ. शिवाजी हुसे, संशोधन परिषदेचे शाखा अध्यक्ष प्रविण दाभाडे, स्वागताध्यक्ष कवी ब्रम्हगिरी गोस्वामी, प्रकाश शहरवाले आणि संयोजन समितीने केले आहे.

## वेब साइट चालत नसल्यामुळे स्वस्त धान्य दुकानावर नागरिकांची रेशन घेण्यासाठी परवड



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** पडेगाव येथील मिटमिटा स्वस्त धान्य दुकानावर "नेट"नसल्यामुळे अनेक कष्टकरी कामकरी रोजंदारी कामगार महिला पुरुषांना पाच तास ताटकळत उन्हात रोजंदारी चे काम सोडून उभे राहवे लागले. यात जेष्ठ महिला,वृद्ध महिला यांचा समावेश होता. रोजंदारी कामावर जाणाऱ्या याचा वेळ वाया जाऊन कामधंदा बुडाला आणि दिवसभर रांग लाऊन ही रेशन मिळाले नाही यामुळे अन्न नागरी पुरवठा करणाऱ्या शासन दिरंगाई बद्दल सदर महिला नी तीव्र संताप व्यक्त केला दोन्ही बाजूंनी उपाशी मारण्याचे काम शासन यंत्रणेकडून होत असल्याबाबद मिटमीटा येथील स्वस्त धान्य दुकानात रेशन घ्यायला आलेल्या नागरिकांमधून तीव्र रोष व्यक्त करण्यात आला.केंद्र शासनाचे NIC विभागाने सदर घटनेची नोंद घेऊन सामान्य नागरिकांची होणारी पिळवणूक थांबवावी अशी मागणी नागरिकांमध्ये होत आहे. यासाठी वेळ वाया घालवल्यामुळे रोजगार बुडाला म्हणून अन्न धान्य वाटप व पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात यावा अशी मागणी येथील नागरिकांनी वर्तमानपत्र प्रतिनिधी यांच्या द्वारे केली आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ जुलै २०२५


## नाशिक रोड कॅम्प केंद्रीय विद्यालयात स्टेम सप्ताहाचा यशस्वी समारोप



**नाशिक (वार्ताहर) :** शहरातील तोफखाना केंद्र स्थित पीएमश्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्पने १४ ते १८ जुलै दरम्यान स्टेम सप्ताह (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) साजरा केला. स्टेम सप्ताहाचा प्राथमिक उद्देश विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (Science Technology Engineering and Maths) क्षेत्रात विद्यार्थ्यांची आवड आणि सहभाग वाढवणे आहे. परस्परसंवादी क्रियाकलाप, प्रकल्प आणि वास्तविक जगाच्या परिस्थितींद्वारे विद्यार्थ्यांना विविध स्टेम संकल्पना आणि अनुप्रयोगांशी परिचित करून हे साध्य केले जाते. या उपक्रमाचा उद्देश्य विद्यार्थ्यांना स्टेम मध्ये भविष्यातील करिअर करण्यासाठी प्रेरित करणे आणि त्यांना तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत जगात भरभराटीसाठी आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करणे हे आहे. हा कार्यक्रम नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुरूप आहे. प्राचार्य गजराज मीना यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्टेम प्रभारी पूजा यादव यांच्या नेतृत्वाखाली हा सप्ताह यशस्वीरित्या संपन्न झाला. यावेळी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आर्डुइनो युनो वापरून रोबोटिक्स, ड्रोन आणि एलईडी डान्सिंग लाइट्स, विविध सेन्सर्स, इलेक्ट्रॉनिक्स घटक इत्यादींसह अभियांत्रिकी प्रकल्पावर चर्चा करण्यात आली. कपिला कार्यक्रमावर चर्चा करण्यात आली. अटल टिंकरिंग लॅबशी संबंधित प्रश्नमंजुषा स्पर्धा, विज्ञान मॉडेल प्रदर्शन आयोजित करण्यात आले. इन्स्पायर पुरस्कार, आरबीव्हीपी इत्यादींबद्दल माहिती देण्यात आली. प्रार्थना सभेत गणित किट उपक्रम, पोस्टर बनवण्याची स्पर्धा, कार्यशाळा आणि इतर नाविन्यपूर्ण कार्यक्रम घेण्यात आले.उज्ज्वला चांदोरकर, पूजा अग्रवाल, निमिषा सिंग, वीणा गौडर, शैलेंद्र कुमार यादव आणि विज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित विषयातील प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण योगदान दिले.विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने भाग घेतला. त्यांची सर्जनशीलता प्रदर्शित केली आणि वैज्ञानिक प्रतिभा प्रदर्शित केली. या कार्यक्रमामुळे विज्ञान, अभियांत्रिकी आणि गणितातील विद्यार्थ्यांची आवड वाढली आहे आणि त्यांचा आत्मविश्वास आणि शोध घेण्याची भावना वाढली आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानात्मक क्षेत्रांमध्ये जाण्यास प्रोत्साहित करण्यासाठी भविष्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यास शाळा वचनबद्ध आहे, असे प्राचार्य गजराज मीणा यांनी यावेळी सांगितले.

## निकषात न बसणाऱ्यांनी माघार घ्यावी छगन भुजबळ यांचे लाडकी बहीण योजनेवर वक्तव्य



**नाशिक :** लाडकी बहिण योजना ही राज्य सरकारची एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेविषयी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी एक मोठे विधान केले आहे. भुजबळ म्हणाले, ज्यांच्याकडे गाड्या, बंगले आहेत, त्यांच्यासाठी ही योजना नाही. ही योजना गरिबांसाठी आहे, श्रीमंतांसाठी नाही. नाशिक जिल्ह्यातील लासलगावमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना छगन भुजबळ बोलत होते.

छगन भुजबळ यांच्या या स्पष्ट विधानामुळे लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांची अट अधिक स्पष्ट झाली आहे. पुढे ते म्हणाले, मी मागेच सांगितले होते की स्वतःहून त्यांनी सांगावे मी या नियमांमध्ये बसत नाही. एवढे करुनही ती मंडळी यामध्ये बसत असतील तर ते अडचणीचे होते. अजूनही गाडी बंगले असतील त्यांनी या लाडकी बहिण योजनेतून माघार घ्यावी असे आवाहन भुजबळ यांनी केले.

आतापर्यंत दिले असेल त्यांच्यावर अजून काही कारवाई होऊ नये यासाठी मी प्रयत्न करेल असेही भुजबळ म्हणाले. पोर्टल बंद नाही, मी डिटेल माहिती घेऊन सांगतो असेही ते म्हणाले. जे या नियमांमध्ये बसत नाहीत त्यांनी कृपा करून थांबावे. खरोखरच ज्यांना आवश्यकता आहे त्यांना न्याय मिळेल. पोर्टलबाबत मी मंत्र्यांसोबत बोलून घेईल, असेही छगन भुजबळ म्हणाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना महाराष्ट्र शासनाने २८ जून २०२४ रोजी सुरू करण्यास मान्यता दिली. या योजनेचा उद्देश राज्यातील महिलांना आर्थिक स्वातंत्र्य प्रदान करणे, त्यांचे आरोग्य व पोषण सुधारण्यासाठी मदत करणे, तसेच कुटुंबातील त्यांच्या निर्णायक भूमिकेला बळकटी देणे असा आहे.

या योजनेंतर्गत, महाराष्ट्रातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांचा आर्थिक लाभ थेट त्यांच्या खात्यात (DBT द्वारे) जमा केला जातो. ही योजना विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांसाठी राबवण्यात येत असून, त्यांना स्थैर्य आणि स्वावलंबन मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ जुलै २०२५


## नाशिकच्या कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच : गिरीश महाजन



**नाशिक** :पालकमंत्री पदाचा अद्याप तिढा सुटलेला नसताना मंत्री गिरीश महाजन यांनी मोठा दावा केला आहे. गिरीश महाजन म्हणाले, नाशिकचा पालकमंत्री कोणीही होवो, कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच असणार, असा दावा त्यांनी केला आहे. नाशिक येथे पुढील वर्षापासून सिंहस्थ कुंभमेळा पार पडणार असून त्या पार्श्वभूमीवर महाजन यांनी हे विधान केले आहे.

मंत्री गिरीश महाजन यांची कुंभमेळा मंत्री म्हणून नियुक्ती देखील करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली कुंभमेळ्याची तयारी देखील सुरू आहे. परंतु, अद्याप नाशिकच्या पालकमंत्री पदाचा तिढा सुटलेला नसून शिवसेना शिंदे गटाचे दादा भुसे पालकमंत्री पदासाठी आग्रही आहेत. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील माणिकराव कोकाटे आणि छगन भुजबळ देखील पालकमंत्री पदाच्या शर्यतीत आहेत.

गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना नाशिक पालकमंत्रीपदाचा निर्णय लवकरच होईल. मात्र, तो निर्णय काहीही असला तरी कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच आहे, असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

नाशिक महापालिकेने सुमारे १५ हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा सादर केला आहे. याशिवाय, इतर नऊ विभागांनी मिळून सुमारे ९ हजार कोटी रुपयांचे स्वतंत्र आराखडे सादर केले आहेत. यामुळे एकूण २४ हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार झाला आहे. मात्र, या आराखड्याला अद्याप राज्य सरकारची मंजुरी मिळालेली नाही, तसेच राज्याच्या अर्थसंकल्पातही यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकमध्ये येत्या कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेतला होता. या वेळी त्यांनी सुमारे २ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांसाठी निविदा काढण्यात आल्याचे जाहीर केले. महापालिकेने गोदावरी, वालदेवी आणि नंदिनी या नद्यांवरील पाच नव्या पुलांसह इतर काही पुलांच्या कामांसाठी निविदा काढल्या आहेत. तसेच, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये प्राधिकरण स्थापन करण्याच्या कायद्याला मंजुरी देण्यात आली होती. या नव्या प्राधिकरणाची जबाबदारी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

## शिक्षक बदल्यांमध्ये गोंधळ : विन्सी कंपनीच्या चुकांमुळे अपात्र शिक्षकही अतिरिक्त ठरणार



**छत्रपती संभाजीनगर** : येथे जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. विन्सी कंपनीमार्फत राबवली जात असलेली ही प्रक्रिया १८ जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार सुरू आहे.

बदली पोर्टलवरील संचमान्यतेनुसार, संवर्ग १ मध्ये अतिरिक्त शिक्षकांना पदस्थापना देण्यात आली. यामुळे काही शाळांमधील शिक्षक, जे बदलीपात्र किंवा अतिरिक्त नव्हते, तेही अतिरिक्त ठरले आहेत. संवर्ग १ मधील शिक्षक आणि मुख्याध्यापकांसाठी रिक्त पदे दर्शवली नसल्याने, पात्र उमेदवारांना पर्याय उपलब्ध झाले नाहीत.

१९ जुलैपासून सुरू झालेल्या संवर्ग २ (पती-पत्नी एकत्रीकरण) बदल्यांमध्येही त्रुटी आहेत. नियमानुसार ३० किलोमीटर अंतराच्या आत किंवा जोडीदार कार्यरत असलेल्या तालुक्यातच बदली व्हायला हवी. मात्र संपूर्ण जिल्ह्यातील पदे पर्यायांमध्ये दाखवण्यात आली आहेत. संवर्ग ३ मधील बदली अधिकार पात्र शिक्षकांच्या यादीतही सेवाज्येष्ठतेचा क्रम पाळला गेला नाही. सेवा कनिष्ठ शिक्षकांची नावे सेवाज्येष्ठ शिक्षकांपूर्वी येत आहेत.

या सर्व त्रुटींमुळे शिक्षक समितीने मुख्यमंत्र्यांकडे निवेदन सादर केले आहे. त्यात विन्सी कंपनीकडून बदल्यांचे अधिकार काढून घेऊन शासन निर्णयानुसार नव्याने बदली प्रक्रिया राबवण्याची मागणी करण्यात आली आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## बीडच्या मातीवर कोणीही शिंतोडे उडवू नये : धनंजय मुंडेंनी विरोधकांना सुनावले

**बीड** : तुम्हारी सोच के सांचे में ढल नहीं सकता, जुबान काट लो लहजा बदल नहीं सकता, अरे मुझे भी मोम का पुतला समझ रहे हो क्या? तुम्हारे लोह से ये लोहा पिघल नहीं सकता, अशी शेरोशायरी करत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत बीडमध्ये आयोजित निर्धार मेळाव्यात धनंजय मुंडेंनी दीर्घ काळानंतर आपली तोफ डागली. २०० दिवस मी गप्प बसलो. डबल सेंच्युरी झाली. पण या काळात बीड जिल्ह्याची जी बदनामी झाली, ती जिव्हारी लागली, बीड जिल्ह्याच्या बदनामी वरून मुंडेंनी संताप व्यक्त केला.

धनंजय मुंडे म्हणाले की, माझ्याशी जर कुणाचे राजकीय वैर असेल, तर ठेवा. पण माझ्या बीड जिल्ह्याची बदनामी करणे चुकीचे आहे. बाहेरून आलेले असोत की याच मातीतले असोत, कुणीही असो बीडच्या नांवाला डाग लावू नका, असा इशाराही मुंडेंनी दिला.

मुंडे यांनी आपल्या शैलीत शेरोशायरी सादर करत विरोधकांवर निशाणा साधला. धनंजय मुंडे म्हटले की, तुम्हारी सोच के सांचे में ढल नहीं सकता, जुबान काट लो लहजा बदल नहीं सकता, अरे मुझे भी मोम का पुतला समझ रहे हो क्या? तुम्हारे लोह से ये लोहा पिघल नहीं सकता!" अशी शायरी म्हणत विरोधकांनी टोला लगावला आहे.

धनंजय मुंडे पुढे म्हणाले, मी तटकरे साहेबांना सांगितले होते की मला भाषण करायचे नाही. पण आज जनतेसमोर उभे राहून हे बोलणे आवश्यक वाटले. मैदानात बोलायचे की सभागृहात हा प्रश्न होता. शेवटी मैदानातच बोलणे योग्य वाटले.

मुंडे यांनी मेळाव्यातील कार्यकर्त्यांना संबोधित करताना, बीड जिल्ह्याने अनेकदा महाराष्ट्राला दिशा दिली आहे. यापुढेही आपण सगळ्यांनी एकत्र येऊन पक्ष मजबूत करायचा आहे. हीच आपल्या मातीची, स्वाभिमानाची जपणूक आहे, असेही ठामपणे सांगितले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ जुलै २०२५

## आळंदीत वारकरी कीर्तनकार परिषदेत एकमत : संतांचे विचार समाजाला जोडण्यासाठी महत्त्वाचे




**पुणे :** विखुरलेल्या समाजाला चालना देण्यासाठी संतांचे विचार अत्यंत महत्वाचे आहे. या समाजाला जोडण्याचे कार्य केवळ वारकरी संप्रदायाने केले आहे.हा संप्रदाय म्हणजे समन्वयाचे स्त्रोत आहे. संतत्व म्हणजे मातृत्व असून हेच समाजाला जोडून ठेवतात असा सूर परिषदेत सहभागी सर्व कीर्तनकार व संत साहित्य अभ्यासक तज्ज्ञांनी काढला.

'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे' व 'एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसद' यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित दोन दिवसीय 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे'चे तिसरे सत्र'वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची लोककल्याणकारी वाटचाल'याविषयावर संपन्न झाले. यासत्रात हा सूर निघाला.

प्रसंगी पंढरपुर येथील वै.हभप श्रीगुरू अप्पासाहेब वासकर महाराज फड चे प्रमुख हभप देवव्रत (राणा) महाराज वासकर,आळंदी येथील हभप डॉ. नारायण महाराज जाधव, श्रीवरद विनायक संस्थानचे प्रमुख हभप उध्दव महाराज मंडलिक,पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे प्रा. हभप डॉ. दिनेश रसाळ, सामाजिक उद्योजक व आरएफआयडी-एनएफसी तंत्रज्ञानाचे प्रणेते असीम पाटील आणि संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक व अर्थव्यवहार विश्लेषक अभय टिळक हे उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ.राहुल कराड होते. तसेच संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांची विशेष उपस्थिती होती. तसेच, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, पद्मश्री पोपटराव पाटील व परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील उपस्थित होते.

दिनेश रसाळ म्हणाले,जगाचे कल्याण हे केवळ संतांच्या विचारातच आहे. त्यामुळे साधु संतांच्या समतेचा विचार समाजाता रुजवावा. यांंनी समाजात माणुसकीचा संदेश दिला आहे. वसुधैव कुटुम्बकमची भावना ठेवणारे संत यांच्या आचरणांमुळेच समाजाची घडी व्यवस्थित बसली आहे. समाजाला सुखी ठेवण्यासाठी सर्वांनी द्वेष वृत्ती संपवावी.

हभप देवव्रत (राणा) महाराज वासकर म्हणाले,वर्तमान काळात वारकरी संप्रदायावर होणाऱ्या अतिक्रमणाला आळा घालणे आवश्यक आहे. येणाऱ्या काळात शैक्षणिक क्षेत्रात वारकरी अभ्यासक्रमाचा समावेश करणे गरजेचा आहे.

उद्धव महाराज मंडलिक म्हणाले,आधुनिक काळात वारकरी संप्रदायाला संकुचित होऊन चालणार नाही. विश्व कल्याणाचा विचार करता आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून संतांचे, कीर्तनकारांचे विचार सर्वदूर पसरवावे. वारकरी समाजाने समाजाला जोडण्याचे काम करीत आहेत. विखूरलेल्या या समाजाला एकत्रित जोडण्याचे कार्य आणि बळ केवळ वारकरी संप्रदायातच आहे. समाज प्रबोधनाचे कार्य वारकरी संप्रदाय करीत आहे. वारीमध्ये चालणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला त्याच्या मनातील सर्व प्रश्नांचे उत्तर मिळतात. शुद्ध व शाकाहरी भोजनामुळे व्यक्तीच्या विचार सरणीत खुप मोठा बदल घडतो.

## आम्हीच इथले भाई म्हणत पुण्यात कोयता गँगची दहशत



**पुणे :**पुण्यात कोयता गँगची पुन्हा दहशत. किरकोळ कारणावरून कोयते हातात घेऊन दहशत माजवणाऱ्या तरुणांचा प्रकार उघडकीस आला आहे. "आम्हीच इथले भाई" असे म्हणत तरुणांच्या जमावाने तब्बल १० ते १२ गाड्यांची तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेमुळे स्थानिक परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला असून, आरोपींचा शोध घेण्याचे काम वेगात सुरू आहे. वारंवार अशा घटनांनी गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यात यंत्रणांच्या अपयशावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पुण्यातील भवानी पेठ परिसरात पुन्हा एकदा कोयता गँगच्या दहशतीचा प्रकार समोर आला असून, शहराच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. किरकोळ कारणावरून संतप्त झालेल्या काही तरुणांनी हातात कोयते आणि तलवारी घेऊन थेट रस्त्यावर उतरून हिंसाचार घडवून आणला.

या हल्लेखोर तरुणांनी १० ते १२ दुचाकी व चारचाकी वाहनांची तोडफोड केली. या घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यामध्ये हे तरुण "आम्हीच इथले भाई, आमच्या नादी कोणी लागू नये" असा इशारा देत दहशत माजवत असल्याचे दिसून येते.

या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा-सुव्यवस्थेवर चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला असून, आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

भवानी पेठ येथील कोयता गँग प्रकरणात मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दोन गटांमध्ये किरकोळ वाद झाला होता. मात्र, काही तासांतच या वादाने हिंसक वळण घेतले. मध्यरात्रीच्या सुमारास, काही तरुणांनी जमाव तयार करून हातात धारदार शस्त्र घेऊन परिसरात दहशत निर्माण केली.

या तरुणांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या अनेक वाहनांवर जोरदार हल्ला चढवून तोडफोड केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. या प्रकारामुळे भवानी पेठ परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी बंदोबस्त वाढवला असून, नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासोबतच, आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास अधिक गतिमान करण्यात आला आहे.

औंध परिसरात घडलेल्या कोयता गँग हल्ल्याच्या प्रकारात काही दिवसांपूर्वी चतु:श्रृंगी पोलिसांनी मोठी कारवाई केली होती. २८ जून रोजी रात्री १२.१५ वाजता, सात जणांच्या टोळीने काही तरुणांवर कोयत्याने आणि काठ्यांनी हल्ला केला होता. या घटनेनंतर परिसरात दहशतीचे वातावरण पसरले होते.

पोलिसांनी या प्रकरणी सातही आरोपींना अटक केली असून, त्यांची धिंड काढत कडक संदेश दिला. चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा हल्ला पूर्ववैमनस्यातून घडला होता. तपासादरम्यान पोलिसांनी एक गावठी कट्टा आणि तीन लोखंडी कोयते जप्त केले आहेत. ही तातडीने केलेली कारवाई पोलिसांच्या कार्यक्षमतेचे उदाहरण ठरली असून, नागरिकांनी याचे स्वागत केले आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ जुलै २०२५

## शिवरायांनीही नेताजी पालकरांना स्वराज्यात घेतले - अंबादास दानवे



**मुंबई :** विधान परिषदेचे मावळते विरोधी पक्षनेते आणि शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात अशी आशा नुकतीच व्यक्त केली होती. त्यानंतर आता एकनाथ शिंदे यांना भविष्यात सोबत घेण्याबाबत त्यांनी नेताजी पालकरांचा उल्लेख करत प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होत आहे.

अंबादास दानवे यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत शिवसेनेच्या भवितव्याबर भाष्य करत अनेक राजकीय संकेत दिले आहेत. आमची एवढी मजबूत संघटना फुटली, ती कुणीतरी फोडली, याची सल मनात कायम राहते. मात्र, आता शिवसेना म्हणून पुन्हा एकत्रित ताकद राज्याला दिसली पाहिजे. तशी आशा ठेवायला काय हरकत आहे? असे विधान त्यांनी नुकतेच केले होते. त्याचवेळी एकनाथ शिंदे भविष्यात सोबत आल्याने त्यांना गद्दार म्हणणार का? असा प्रश्न विचारला असता त्यावर त्यांनी नेताजी पालकरांचा दाखला देत एका वाक्यात प्रतिक्रिया दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील नेताजी पालकर यांना शुद्धीकरण करून स्वराज्यात घेतले होते, असे म्हणत एकनाथ शिंदे यांना भविष्यात सोबत घेण्याबाबत अंबादास दानवे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी ही नेताजी पालकर यांना शुद्धीकरण करून स्वराज्यात घेतले होते, यावर मी एवढेच बोलेल, असे सूचक सूचक विधान अंबादास दानवे यांनी केले.

अंबादास दानवे पुढे म्हणाले, शिवसेनेबाबत आजही वेदना होतात. रक्ताने जोडलेले लोक जेव्हा विरोधात जातात, तेव्हा वेदना होणे साहजिक आहे. एकनाथ शिंदे यांनाही आतून काहीतरी जाणवत असावे, असे मला वाटते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदित्य ठाकरे यांच्या संभाव्य भेटीबाबत प्रतिक्रिया देताना अंबादास दानवे म्हणाले, आम्ही भाजपला उघडपणे भेटलो आहोत. आम्ही शत्रू नाही, विरोधक आहोत. आमच्यात विचारांची लढाई आहे. त्यामध्ये काही सुरू आहे, असे आम्हाला वाटत नाही.

राज्यात दुबार पेरणीचे संकट आहे, बी-बियाणे वाया गेलेत, मात्र कृषिमंत्री माणिकराव कोकाटे सभागृहात रमी खेळत असल्याचे दिसले. त्यांनी घरी खेळावे, शेतकरी परेशान आणि हे मंत्री असंवेदनशील दिसत आहेत. मंत्री मोबाईलवर खेळत दिसतात हे दुर्दैव आहे. शिवाय त्यांची ही पहिलीच घटना नाही. कधी ओसाड गावची पाटीलकी म्हणतात. तर कधी काहीही बोलतात. ही फडणवीस यांची मजबुरी दिसतेय की, त्यांनी त्यांना मंत्रीपदावर ठेवलंय. त्यावर कारवाई व्हावी आणि त्यांना घरी बसवावे, अशी आमची मागणी आहे. यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही. अशी संतप्त प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी दिली.

## शिरलातांडा शिवारात दरोडेखोरांच्या मारहाणीत एक जखमी



**हिंगोली :** औंढा नागनाथ तालुक्यातील शिरला तांडा शिवारात एका आखाड्यावर कुऱ्हाड, चाकू, लाकडी दांडा घेऊन आलेल्या दरोडेखोरांनी एका शेतकऱ्याला मारहाण करीत तेथील दोन महिलांच्या अंगावरील १.०६ लाख रुपये किंमतीचे दागिने पळवले. या प्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात रविवारी ता. २० पहाटे गुन्हा दाखल झाला आहे. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत तालुक्यातील रांजाळा येथील तुकाराम रणवीर हे त्यांची पत्नी, मुलगा, सुन व नातु यांच्यासह शिरलातांडा शिवारातील शेतातील आखाड्यावर राहतात. शनिवारी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास चार दरोडेखोर हातात कुऱ्हाड, चाकू, लाकडी दांडा घेऊन आखाड्यावर आले. यावेळी त्यांनी तुकाराम रणवीर व त्यांच्या कुटुंबियांना मारहाण केली. यामध्ये तुकाराम यांना दुखापत झाली. त्यानंतर दरोडेखोरांनी तुकाराम यांची पत्नी व सुनेच्या अंगावरील दागिने असा १.०६ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल घेऊन पळ काढला.

या घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, औंढा पोलिस ठाण्याचे निरीक्षक जी. एस. राहिरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक कैलास भगत, उपनिरीक्षक माधव जिव्हारे, कानगुले, जमादार दिलीप नाईक, संदीप टाक, इम्रान सिद्दीकी, रविकांत हरकाळ यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण केले. श्वान पथकाने घटनास्थळापासून काही अंतरावर माग काढला. या घटनेमध्ये जखमी झालेल्या तुकाराम यांना उपचारासाठी जवळाबाजार येथील रुग्णालयात दाखल केले आहे.

याप्रकरणी तुकाराम रणवीर यांच्या तक्रारीवरून औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात रविवारी ता. २० पहाटे गुन्हा दाखल झाला आहे. दरोडेखोरांच्या शोधासाठी औंढा पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रवाना करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## कंगनाने मंडीच्या पुराला भूकंप म्हटले



**बाजार :** मंडीची खासदार अभिनेत्री कंगना रणौत पुन्हा एकदा वादात सापडली आहेत. कंगनाने मंडीतील पूरग्रस्तांना भूकंपग्रस्त म्हटले होते, त्यानंतर तिचे विधान सोशल मीडियावर व्हायरल झाले. कंगनाने दिल्लीत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मंडीमध्ये मोठा भूकंप झाला आहे आणि याबाबत मंत्रालयांशी चर्चा सुरू आहे. शनिवारी दिल्लीतील एका एजन्सीला दिलेल्या मुलाखतीत कंगनाने हे सांगितले.

प्रत्यक्षात मंडीमध्ये भूकंप झाला नव्हता, तर ढगफुटी झाली होती. या खोट्या विधानानंतर लोकांनी सोशल मीडियावर कंगनावर टीका करायला सुरुवात केली. यानंतर, बुंग रेलचक गावातील रहिवासी नीलमचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये नीलमने कंगनावर गंभीर आरोप केले आहेत.

नीलम म्हणाल्या की, निवडणुकीच्या काळात कंगना प्रत्येक घरात हात जोडून मते मागण्यासाठी आली होती. पण या संकटाच्या काळात तिने एकदाही पीडितांची काळजी घेतली नाही. खरं तर, 30 जून आणि 1 जुलै रोजी सेराज परिसरात ढगफुटीमुळे अनेक लोक बेघर झाले. घटनेला 19 दिवस उलटूनही अनेक गावांमध्ये वीज आणि पाण्याची सुविधा पूर्ववत झालेली नाही. यापूर्वीही ढगफुटीच्या घटनेवरील वक्तव्यांमुळे कंगना वादात सापडली आहे. स्थानिकांचे म्हणणे आहे की खासदार असल्याने तिने परिसरातील समस्यांबद्दल अधिक संवेदनशील असले पाहिजे.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस
DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी, १२ वी पास
C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी, १२ वी पास
E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी, १२ वी पास
O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी, १२ वी पास
PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
9405109103 | 8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002